ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625 (UIF) Volume - 6 | Issue - 6 | July - 2016

Indian Streams Research Journal
International Recognized Multidisciplinary Research Journal
ISSN No : 2230-7850 Impact Factor : 4.1625 (UIF) [Yr. 2016]

ISRJ Indian Streams Research Journal

# माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये व शालेय संपादन यातील सहसंबंध

डॉ. वसुधा विनोद देव
सहयोगी प्राध्यापक, शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला.

**सारांश :**
शिक्षण हे मूल्य संवर्धनाचे साधन आहे. शालेय स्तरावर शिक्षण घेत असतांना विद्यार्थ्याला प्राप्त होणारे गुण यावर त्याचा मूल्य मापन होतो. परंतु या शिक्षणातून त्याच्यामधून मूल्यांची रूजवणुक किती होते ही बाब अत्यंत महत्वाची आहे व या दोहोंमध्ये सहसंबधं असणे ही बाबही महत्वाची आहे. प्रस्तुत



संशोधनातून माध्यमिक स्तरावरील इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांची संपादणूक व त्यांच्यामध्ये रूजलेली विशिष्ट मूल्य, त्यात प्रामुख्याने — धार्मिक मूल्य, सामाजिक मूल्य, लोकशाही मूल्य, सौंदर्य विषयक मूल्य, आर्थिक मूल्य, ज्ञानात्मक मूल्य, जीवन विषयक मूल्य, शक्ती विषयक मूल्य, आरोग्य विषयक मूल्य व कौटूंबीक प्रतिष्ठा विषयक मूल्य किती रूजले हे पाहणे महत्वाचे ठरते. त्याच प्रमाणे त्यांचे संपादन व मूल्य यांचा सहसंबंध पडताळणे आवश्यक ठरते. याकरीता प्रस्तुत संशोधना अंतर्गत डॉ. जी.पी. शेरी आणि प्राध्यापक आरती वर्मा यांनी तयार केलेली पि.व्ही.क्यु. चा वापर करून माहिती संकलीत करण्यात आली व हा सहसंबंध पडताळण्यात आलेला आहे.

**बीजशब्द —** माध्यमिक स्तर, विविध मूल्य, शालेय संपादन, सहसंबंध.

**प्रस्तावना :**

आधुनिक आणि उज्वल भारताचे भावी नागरीक हे संस्कारशील होण्यासाठी जीवनमुल्यांचे संस्कार आवश्यक आहेत. पायाभुत जीवनमुल्यांचा ऱ्हास होणे व आदर्श जिवनासाठी या धकाधकीच्या काळात मूल्य संस्कार होणे याचे महत्व आहे. आधुनिक कालखंडात मात्र मुल्यांच्या जडणघडणीची बैठक थोडी सैल झाल्या सारखी वाटते, याचे महत्वाचे कारण पाश्चात्यिकरणाचा झालेला अवलंब व सोशल मिडीयाचा अनावश्यक वापर. यामुळे शिक्षण, समाज व कुटूंब हया मूल्य संस्कार करणाऱ्या ज्या मुलभूत संस्था आहेत त्यातुन मूल्य संस्कार दुर्लक्षित झाल्या सारखे वाटतात. माध्यमिक स्तर हा विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातुन महत्वाचा कालखंड आहे. या स्तरावर विद्यार्थी गुणांच्या संदर्भाला महत्व आहे. जिथे प्रगती चांगली तर सगळं व्यवस्थित असे समजण्यात येते, त्यामुळे मुल्य रूजवणूक व विद्यार्थ्यांचे संपादन हयात सहसंबंध आहे किंवा नाही हे तपासणे महत्वाचे ठरते.

## समस्या विधान :

**''माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील मूल्ये व शालेय संपादन यातील सहसंबंध.''**

## संशोधनाची उद्दीष्टे :

१) माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील रूजलेल्या मूल्यांचा शोध घेणे.
२) विद्यार्थ्यांच्या शालेय संपादणुकींचा शोध घेणे.
३) विद्यार्थ्यांमधील मूल्य व त्यांचे संपादन यातील परस्पर संबंध पडताळणे.

## संशोधनाची परिकल्पना :

विद्यार्थ्यांमधील मूल्ये व संपादन यात सार्थ सहसंबंध आढळुन येत नाही.

## चले :

अ) स्वाश्रयी चल मूल्य
ब) आश्रयी चल संपादन

## संशोधनाची व्याप्ती :

१) प्रस्तुत संशोधन हे अकोला शहरातील दोन माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यां पुरते मर्यादीत आहे.
२) प्रस्तुत संशोधन मुल्य शिक्षण व संपादणुक यांच्याशी संबंधीत आहे.
३) प्रस्तुत संशोधन हे ९ व्या वर्गा पुरते मर्यादीत आहे.
४) प्रस्तुत संशोधन हे धार्मिक मुल्य, सामाजिक मूल्य, लोकशाही मूल्य, सौंदर्य दृष्टी विषयक मूल्य, आर्थिक मूल्य, ज्ञानात्मक मूल्य, जीवन विषयक मूल्य, शक्ती विषयक मूल्य, आरोग्य विषयक मूल्य व कौटूंबीक प्रतिष्ठा विषयी मूल्य याच्याशी संबंधीत आहेत.

## न्यादर्श :

प्रस्तुत संशोधनाकरीता अकोला शहरातील दोन माध्यमिक शाळांतील ५० मुले व ५० मुली यांची निवड यादृच्छिक न्यादर्श पध्दतीने करण्यात आली.

## माहिती संकलनाची साधने :

संशोधन समस्येची माहिती मिळविण्याकरीता विद्यार्थ्यांच्या अंगी रूजलेल्या मूल्यांचा शोध घेण्यासाठी डॉ. जि. पी. शेरी आणि प्रा. आर. पी. वर्मा यांनी तयार केलेली पि.व्ही.क्यु. (Personal Value Questionnaire) चा वापर करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक गूण संपादनाकरीता प्रथम सत्रांत परिक्षेतील गुणसंपादन ग्राह्य मानण्यात आले.

## संशोधनाची पध्दती :

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

## माहिती संकलन, विश्लेषण व अर्थ निर्वचन :

संशोधन समस्येची माहिती संकलनाकरीता प्रत्यक्ष माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांकडुन प्रमाणित चाचणी सोडवुन घेण्यात आली. ह्या चाचणीचे आलेले निकाल पुढील प्रमाणे.

**कोष्टक क्र. १ — माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांत रूजलेले विविध मूल्य दर्शक तक्ता**

| मूल्य घटक | उच्चतम ६५ व त्यापेक्षा जास्त | सामान्यापेक्षा उच्च ५५ तमे ६४ | सामान्य ४६ ते ५४ | सामान्यांपेक्षा कमी ३५ ते ४५ | कनिष्ठ ३४ व त्यापेक्षा कमी |
|---|---|---|---|---|---|
| धार्मिक मूल्य स्तर | ००% | ०२% | २८% | ५७% | १३% |
| सामाजिक मूल्य स्तर | ०२% | १९% | ४०% | २८% | ११% |
| लोकशाही मूल्य स्तर | ००% | १५% | ४०% | ४३% | ०१% |
| सौंदर्य विषयक मूल्य | १४% | ४१% | ३४% | ०८% | ०३% |
| आर्थिक मूल्य | ११% | ४५% | ३८% | ०६% | ००% |
| ज्ञानात्मक मूल्य | ०२% | २२% | ४१% | २७% | ०८% |
| जीवन विषयक मूल्य | ३३% | ४०% | २०% | ०७% | ००% |
| शक्ती विषयक मूल्य | १३% | ४१% | ३९% | ०६% | ०१% |
| कौटूंबिक मूल्य | ००% | २०% | ३३% | ४४% | ०३% |
| आरोग्य विषयक मूल्य | ००% | ००% | २९% | ५६% | १५% |

**कोष्टक क्र. २ — विद्यार्थ्यांच्या शालेय संपादणुकीतील प्रथम सत्रांत परिक्षेतील विद्यार्थ्यांचे प्रमाण दर्शक तक्ता**

| उत्तीर्णता श्रेणी | प्रथम सत्रांत परिक्षेतील विद्यार्थ्यांचे प्रमाण (टक्केवारी) |
|---|---|
| प्राविण्य श्रेणी (७५ व त्यापेक्षा जास्त गुण) | ०९ |
| प्रथम श्रेणी (६१ ते ७४ गुण) | २९ |
| द्वितीय श्रेणी (४५ ते ६०गुण) | ५१ |
| तृतीय श्रेणी (४४ व त्यापेक्षा कमी) | ११ |

**कोष्टक क्र. ३ — विविध श्रेणी गुण संपादीत विद्यार्थी व मूल्ये यातील सहसंबंध दर्शक तक्ता**

| संपादन स्तर | धार्मिक मूल्य | सामाजिक मूल्य | लोकशाही मूल्य | सौंदर्य मूल्य | आर्थिक मूल्य | ज्ञानात्मक मूल्य | जीवन विषयक मूल्य | शक्ति विषयक मूल्य | कौटूंबीक प्रतिष्ठा मूल्य | आरोग्य मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रथम स्तराचे गुणसंपादन | ०.०५ व ०.०१ सार्थकता स्तरावर (df = 98) करिता सार्थक सहसंबंधाचा स्विकार वा त्याग<br>(*) ०.०५ सार्थकता स्तरावर (df = 98) करिता शूल्य परिकल्पनेचा त्याग तर ०.०१ सार्थकला स्तराकरिता सार्थक शून्य परिकल्पनेचा स्विकार. | | | | | | | | | |
| मध्यमान | ६ | १० | ११ | ६ | ४ | ९ | ६ | ५ | ६ | ४ |
| प्रमाण विचलन | २.५७ | २.८७ | १.८९ | २.७४ | २.९५ | ३.०० | २.७७ | २.५३ | ३.०९ | २.६८ |
| सहसंबंध | —०.१५ | —०.१४ | ०.१४ | ०.१५ | —०.०६ | —०.१७ | —०.०१ | ०.२४ | ०.०९ | ०.०१ |
| | परिकल्पना स्वीकार | परिकल्पना स्वीकार | परिकल्पना स्वीकार | परिकल्पना स्वीकार | परिकल्पना स्वीकार | परिकल्पना स्वीकार* | परिकल्पना स्वीकार | परिकल्पना स्वीकार* | परिकल्पना स्वीकार | परिकल्पना स्वीकार |
| द्वितीय स्तराचे गुणसंपादन | ०.०५ व ०.०१ सार्थकता स्तरावर (df = 98) करिता सार्थक सहसंबंधाचा स्वीकार वा त्याग. | | | | | | | | | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मध्यमान | १ | ८ | ७ | ९ | ५ | ७ | ५ | ३ | २ | ५ |
| प्रमाण विचलन | २.७० | ३.१७ | २.६८ | २.५० | २.६४ | ३.२१ | ३.३३ | २.७५ | ३.४० | २.०१ |
| सहसंबंध | –०.१२ | ०.७४ | ०.००१ | ०.३२ | ०.१२ | ०.०८ | –०.३७ | –०.०३ | –०.२८ | –०.०१ |
| | परिकल्पना स्वीकार | परिकल्पना त्याग | परिकल्पना स्वीकार | परिकल्पना त्याग | परिकल्पना स्वीकार | परिकल्पना स्वीकार | परिकल्पना त्याग | परिकल्पना स्वीकार | परिकल्पना त्याग | परिकल्पना स्वीकार |
| तृतीय स्तराचे गुणसंपादन | ०.०५ व ०.०१ सार्थकता स्तरावर (df = 98) करिता सार्थक सहसंबंधाचा स्विकार वा त्याग<br>(*) ०.०५ सार्थकता स्तरावर (df = 98) करिता शून्य परिकल्पनेचा त्याग तर ०.०१ सार्थकला स्तराकरिता सार्थक शून्य परिकल्पनेचा स्विकार. | | | | | | | | | |
| मध्यमान | ६ | ४ | ११ | ६ | ६ | १२ | ६ | ७ | ७ | ४ |
| प्रमाण विचलन | २.७६ | ४.७९ | २.३३ | ३.८२ | २.७७ | १.९७ | २.६९ | १.९४ | १.७४ | ३.०८ |
| सहसंबंध | ०.५३ | –०.००७ | –०.१३ | –०.०३ | –०.२० | ०.२५ | ०.२४ | –०.२८ | ०.३४ | –०.३१ |
| | परिकल्पना त्याग | परिकल्पना स्वीकार | परिकल्पना स्वीकार | परिकल्पना स्वीकार | परिकल्पना त्याग* | परिकल्पना त्याग* | परिकल्पना त्याग* | परिकल्पना त्याग | परिकल्पना त्याग | परिकल्पना त्याग |

## समस्येचे प्रमुख निष्कर्ष :

### अ) विद्यार्थ्यांच्या मूल्य विषयक दृष्टीकोनाबाबत निष्कर्ष :

विद्यार्थ्यांमध्ये धार्मिक मूल्य, सामाजिक मूल्य, लोकशाही मूल्य, आर्थिक मूल्य, जिवनविषयक मूल्य, शक्तीविषयक मूल्य व कौटूंबीक प्रतिष्ठाबाबत मूल्य याबाबत सकारात्मक दृष्टीकोन आढळतो. परंतु सौंदर्य विषयक मूल्य व ज्ञानात्मक मूल्य याबाबत नकारात्मक दृष्टीकोन आढळतो.

१) प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्य, सौंदर्य विषयक मूल्य, शक्तीविषयक मूल्य, कौटूंबीक प्रतिष्ठा विषयक मूल्य यात धनात्मक संबंध दिसून आला परंतू इतर मूल्यांच्या बाबतीत ऋणात्मक स्वरूपाचा मध्यम ते चांगल्या प्रतिचा सहसंबंध आढळला.

२) प्रथम श्रेणी प्राप्त बहुतेक विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्य, सौंदर्य विषयक मूल्य, शक्ती विषयक मूल्य, कौटूंबीक विषयक मूल्य, आरोग्य विषयक मूल्या यात धनात्मक सहसंबंध आढळून आला, परंतु बाकी मूल्यांच्या संबंधात ऋणात्मक संबंध आढळुन आला.

३) द्वितीय श्रेणी प्राप्त विद्यार्थ्यांत धार्मिक मूल्य, ज्ञानात्मक मूल्य, शक्ती विषयक मूल्य, आरोग्य विषयक मूल्य, कौटूंबीक प्रतिष्ठा विषयक मूल्य व जीवन विषयक मूल्या यात ऋणात्मक स्वरूपाचा कमी ते मध्यम स्वरूपाचा सहसंबंध दिसून आला. परंतु बाकी मूल्यांच्या बाबतीत धनात्मक स्वरूपाचा चांगल्या प्रतिचा संबंध दिसून आला.

४) तृतीय श्रेणी प्राप्त बहुतूेक विद्यार्थ्यांमध्ये विविध मूल्यांत ऋणात्मक स्वरूपाचा कमी ते मध्यम प्रतीचा सहसंबंध दिसून आला.

## संदर्भग्रंथ सूची :

१. कुंडले, म. बा. (१९९०). शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, पुणे: श्री विद्या प्रकाशन.
२. सहस्त्रबुध्दे, हि. ह. (१९९८). शिक्षणातून मूल्य संवर्धन. पुणे: साधना प्रकाशन.
३. मुळावकर संतोष व मुळावकर कल्पना (२००५). मूल्य शिक्षण – सुसंवाद. नागपूर: विद्या प्रकाशन.